| | | |
|---|---|---|
| | | पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली जनसंपर्क शाखा<br>P.R.O Office, Gadchiroli<br>**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli<br>**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com |

# वार्तापत्र

दिनांक ९/१०/२०१९

## '' गडचिरोली पोलीस दलाचे ऐतिहासिक यश चातगाव दलम कमांडर सह संपुर्ण दलम मधील माओवादयांचे पोलीसांसमोर आत्मसमर्पण''

- **गडचिरोली पोलीस दलाच्या प्रभावी नक्षल विरोधी अभियानाला विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठे यश**

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली आत्मसमर्पण योजना, वर्षभरात विविध चकमकीत माओवाद्यांचा झालेला खात्मा तसेच हिंसाचाराच्या जिवनाला कंटाळुन वरिष्ठ माओवाद्यांसह अनेक जहाल माओवाद्यांनी आजपर्यंत आत्मसमर्पण केलेले आहे. त्याच बरोबर आत्मसमर्पित माओवाद्यांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवुन आणल्यामुळे माओवादी मोठया संख्येने आत्मसमर्पण करीत आहेत. नुकतेच एकुण ३३ लाख ५० हजार रुपये बक्षीस असलेल्या चातगाव दलम सह ०७ जहाल नक्षलवादयांनी मा. पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सा.,यांच्या समोर आत्मसमर्पण केले आहे.

१) **राकेश उर्फ गणेश सनकु आचला** हा ३४ वर्ष वयाचा माओवादी असुन तो माहे जुन २००६ मध्ये टिपागड दलम मध्ये सदस्य म्हणुन भरती होवुन माहे जानेवारी २०१२ पासुन ते आजपावेतो तो माओवाद्यांच्या चातगाव दलमच्या कमांडर पदावर कार्यरत होता. त्याचेवर **२० चकमकीचे,०७ खुनाचे, ०२ जाळपोळीचे गुन्हे दाखल असुन महाराष्ट्र शासनाने त्याचेवर एकुण ०५ लाख ५० हजार रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

२) **देविदास उर्फ मनिराम सोनु आचला** ही २५ वर्ष वयाचा माओवादी असुन तो माहे जानेवारी २०११ मध्ये चातगाव दलम मध्ये सदस्य म्हणुन भरती होवुन २०१४ पासुन आजपर्यंत चातगाव दलमच्या उपकमांडरपदी कार्यरत होता. त्या**च्यावर चकमकीचे ०९ खुनाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर महाराष्ट्र शासनाने ०५ लाखरूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

**३. रेश्मा उर्फ जाई दुलसु कोवाची** वय १९ वर्षाची माओवादी असुन माहे २०१७ मध्ये चातगाव दलमच्या सदस्य पदावर भरती होवुन आजपर्यंत चातगाव दलममध्ये कार्यरत होती. तिचेवर **चकमकीचे ०२ व खुनाचा एक गुन्हा दाखल आहे.** महाराष्ट्र शासनाने तिच्यावर ०४ लाख ५० हजार रपयाचे बक्षीस जाहीर केले होते.

४. **अखिला उर्फ राधे झुरे,** वय २७ वर्ष, वयाची माओवादी असुन माहे २०१२ ला कसनसुर दलम मध्ये कसनसुरद दलम मध्ये भरती होवून माहे मे २०१९ पासुन चातगाव दलम मध्ये सदस्य पदावर कार्यरत होतीत्र तीचेवर चकमकीचे **०९ गुन्हे खुनाचे ०३ गुन्हे व जाळपोळीचे ०३ गुन्हे दाखल आहेत. महाराष्ट्र शासनाने ४ लाख ५० हजार रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

**५. शिवा विज्या पोटावी,** वय २२ वर्ष वयाचा माओवादी असुन २०१४ मध्ये कसनसुर दलम मध्ये भरती होवून सप्टेंबर २०१८ पासुन चातगाव दलम मध्ये कार्यरत होता. त्याचेवर **चकमकीचे ०३ गुन्हे दाखल आहे. महाराष्ट्र शासनाने ४ लाख ५० हजार रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

**६. करुना उर्फ कुम्मे रामसिंग मडावी, वय २२ वर्ष वयाची माओवादी असुन नोव्हेंबर २०१६ पासुन टिपागड दलम मध्ये कार्यरत होती. तिच्यावर चकमकीचे ०२, खुनाचा ०१ जाळपोळीचे ०३ गुन्हे दाखल आहे. महाराष्ट्र शासनाने ४ लाख ५० हजार रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

**७. राहुल उर्फ दामजी सोमजी पल्लो, वय २५ वर्ष, वयाचा माओवादी असुन नोव्हेंबर २०१३ मध्ये कसनसुर दलम मध्ये सदस्य म्हणुन भरती झाला. माहे जानेवारी २०१४ पासुन प्लाटुन नंबर ३ मध्ये सदस्य पदावर कार्यरत होता. त्याचेवर चकमकीचे १० गुन्हे, खुनाचे ०४ गुन्हे व जाळपोळीचे ०२ गुन्हे दाखल आहेत. महाराष्ट्र शासनाने ५ लाख रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

. आत्मसमर्पित माओवादी हे दलम मध्ये काम करतांना महिलांवर होत असलेले अत्याचार तसेच दलम मधील माओवादी हे अल्पवयीन आदिवासी मुलींना पळवुन नेवुन बळजबरीने त्यांना दलममध्ये भरती करत होते असे कबुल करत आदिवासींवर होणारे अनन्वयीत अत्याचार व माओवादी नेहमीच स्वत:च्या फायदया साठी जाणुन बुजुन दुर्गम व अति दुर्गम भागाचा विकास कामात आडकाठी निर्माण करतात. या सर्व बाबींना कंटाळुन नक्षलवादयांच्या तावडीतून स्वत:ची सुटका करून घेत आपल्याला विकासाच्या मुळ प्रवाहात परत जावुन सामान्य व्यक्तीसारखे जीवन जगता येईल की नाही ? याबाबत आमच्या मनामध्ये साशंकता होती असे सांगीतले. परंतू पोलीस दलाने निर्माण केलेल्या विश्वासामुळे व महाराष्ट्र शासनाच्या आत्मसमर्पित योजनेमुळे आम्ही आज पोलीसांपुढे आत्मसमर्पण करत असल्याचे या आत्मसमर्पितांनी स्पष्ट केले आहे.

यावेळी त्यांनी दलममधील इतर माओवादी यांनी देखील हिंसाचाराचा मार्ग सोडून आपणच आपल्या आदिवासी बांधवांवर करत असलेले अनन्वित अत्याचार थांबवुन आपल्या भागाचा देखील इतर उन्नत समाजाप्रमाणे विकास व्हावा. या दृष्टीने विकासाच्या मुळ प्रवाहात येण्यासाठी आत्मसमर्पण योजनेचा फायदा घेत विकासाच्या मुळ प्रवाहात यावे याबद्दल आवाहन केले.

गडचिरोली पोलीस दलाने अतिशय प्रभावीपणे नक्षलविरोधी अभियान राबविल्यामुळे सन २०१९ मध्ये आजपर्यंत मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सर यांचे समोर एकुण २३ माओवादयांनी आत्मसमर्पण केले असुन यात ०३ डिव्हीसी, ०१ दलम कमांडर, ०१ दलम उपकमांडर, १७ सदस्य, ०१ जनमिलीशिया यांचा समावेश आहे. तर २१ माओवादयांना अटक करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे. यामध्ये डी. के. एस. झेड. सी. मेंबर ०२, दलम कमांडर ०१, सदस्य ०३, पार्टी मेंबर ०२, समर्थक १३ यांचा समावेश आहे.

विकास कामांना रोखणा-या माओवाद्यांवर पोलीस दल सक्षमपणे कारवाई करण्यास तत्पर असुन जे माओवादी विकासाच्या प्रवाहात सामील होण्यास इच्छुक असतील त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच लोकशाहीतील सन्मानाचे जीवन जगण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सर्वतोपरी मदत करेल. असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सो. यांनी केले आहे.


GADCHIROLI POLICE
वीर भोग्या वसुंधरा
FORTUNE FAVOURS THE BRAVE
महाराष्ट्र पोलीस


GADCHIROLI POLICE
वीर भोग्या वसुंधरा